पंजीयन क्रमांक – एनजीपी/बीएनके/162/1969

विवेकानंद

१९६९ पासून विश्वासाची उज्ज्वल परंपरा

नागरी सहकारी प्रत्यय संस्था, मर्या.

कार्यक्षेत्र–नागपूर जिल्हा

मुख्य कार्यालय : 361, रुईकर रोड, महाल, नागपूर–440032. ● 0712-2776009, 2726009 09370981964
e-mail : vivekanandsoc@gmail.com website - www.vivekanandsoc.com

55 वर्षांची दृढ विश्वासाची उज्ज्वल परंपरा

55 वां वार्षिक अहवाल

२०२३ - २०२४

विवेक जुगादे
अध्यक्ष

महेश अंधारे
उपाध्यक्ष

संचालक

सुधीर दप्तरी

ईश्वर परचाकी

कल्याण दिवाण

श्रीकांत आगलावे

मधु गौर

विवेक बापट

विवेक धाक्रस

डॉ.सौ. राधिका मुरकुटे

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य मा. श्री. भैय्याजी जोशी
यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करतांना
संस्थेचे अध्यक्ष विवेक जुगादे, उपाध्यक्ष महेश अंधारे व संचालकगण

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम क्षेत्राचे क्षेत्रीय कार्यवाह मा. श्री. बाळासाहेब चौधरी यांनी
संस्थेला सदिच्छा भेट देत संस्थेच्या कार्याची प्रशंसा केली. सोबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे
नागपूर महानगर कार्यवाह मा. श्री. रविंद्रजी बोकारे.

डॉ.सौ. माधुरी इदुरकर दिपक बारड राहुल वेलंकीवार आनंद गोंधळेकर
सी.इ.ओ.

महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याचे नागपूर विभागीय सहनिबंधक मा. श्री. प्रवीणजी दानवडे
यांनी संस्थेला भेट दिली असता संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

श्रीराम जन्मभूमी प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे औचित्य साधून संस्थेने साकार केलेल्या आकर्षक दिनदर्शिकेचे विमोचन रा.स्व.संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य मा. श्री. भैय्याजी जोशी यांच्या हस्ते करण्यात आले.



संस्थेच्या वतीने स्वामी विवेकानंद जयंती कार्यक्रमात प्रमुख वक्ते या नात्याने उपस्थित रा.स्व.संघाचे विदर्भ प्रांताचे सहसंघचालक मा. श्री. श्रीधरजी गाडगे यांचा सत्कार करतांना संस्थेचे अध्यक्ष श्री. विवेक जुगादे, सोबत साधना सहकारी बँकेचे अध्यक्ष मा. श्री. घनश्याम कुकरेजा व संस्थेचे उपाध्यक्ष श्री. महेश अंधारे

सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. दिनानाथजी ठाकूर, राष्ट्रीय महामंत्री मा. डॉ. उदयजी जोशी व राष्ट्रीय संघटनमंत्री मा. श्री. संजयजी पाचपोर यांनी संस्थेला सदिच्छा भेट दिली असता संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

विवेकानंद नागरी सहकारी प्रत्यय संस्था मर्यादित

55 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. 01 सप्टेंबर 2024 रोजी सकाळी 9.00 वाजता संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. विवेक दिनकरराव जुगादे यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षक सहकारी बँकेचे सभागृह, गांधी सागर, महाल नागपूर- 32 येथे होईल. सभेत खालील विषयांवर विचार करण्यात येईल. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास स्थगित सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सुरु करण्यात येईल, त्यास गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

सभेपुढे येणारे विषय

1) मागील सर्वसाधारण सभेचा अहवाल कायम करणे.
2) सन 2023 - 2024 चे वार्षिक अहवाल वाचन करून त्यास स्विकृती प्रदान करणे.
3) सन 2023-2024 चे जमा-खर्च, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक आणि सन 2024 - 2025 च्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे व गतवर्षीच्या अधिक झालेल्या खर्चास मान्यता देणे.
4) सन 2023-2024 च्या नफ्याच्या विनियोगास मंजूरी देऊन लाभांश जाहीर करणे.
5) वैधानिक लेखा परीक्षकाच्या लेखा परीक्षण अहवालावर विचार करून स्विकृती प्रदान करणे.
6) सन 2024- 2025 करीता वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे.
7) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती देणे.
8) सामोपचार योजनेतील कर्ज खात्याची माहिती देणे.
9) नियम 49 नुसार वैधानीक लेखा परीक्षकाद्वारे प्रमाणित बुडीत कर्ज राशी निर्लेखीत करण्यास मंजुरी प्रदान करणे.
10) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय.

आनंद श्रीराम गोंधळेकर
मुख्य कार्यकारी अधिकारी
संचालक मंडळाच्या अनुमतीने

नागपूर
दिनांक : 29/07/2024

* सूचना *

1. ज्या सभासदांनी मागील दोन वर्षांचा लाभांश घेतला नसेल, त्यांनी तो कार्यालयातून घेवून जावा. तीन वर्षांवरील लाभांशाची रक्कम राखीव निधीला वळती करण्यात येते, याची सभासदांनी कृपया नोंद घ्यावी.
2. सभासदांचे भाग प्रमाण पत्र तयार असून ते त्यांनी संस्थेच्या मुख्य कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावे. तसेच ज्या सभासदांनी आपल्या भागांवर नामनिर्देशन केले नसतील त्यांनी ते करून घ्यावेत. केवायसी अद्यावत केले नसल्यास करावे.
3. ज्या सभासदांचे (नाममात्र सभासद सोडून) मुलगा / मुलगी मार्च 2024 च्या 10वी, 12वी, पदवी अंतिम अथवा पदव्युत्तर अंतिम परीक्षेत 75 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त टक्क्यांनी उत्तीर्ण झाले असेल तसेच ज्या विद्यार्थ्यांनी राज्य, राष्ट्रीय स्तरावर अन्य अथवा क्षेत्रामध्ये चमकदार कामगिरी केली असेल त्यांनी पाल्याची गुणपत्रीका, स्वतःचा पत्ता व मोबाईल नंबरसह कार्यालयात लवकरात लवकर पाठवावी. या विद्यार्थ्यांच्या सत्कारा संबंधी विस्तृत सूचना संबंधितांना कार्यालयातुन देण्यात येईल. सत्काराकरीता या गुणवंतांनी स्वतः उपस्थित राहणे अनिवार्य राहील.
4. सभासदांचे काही प्रश्न असल्यास त्यांनी ते लेखी स्वरुपात संस्थेच्या मुख्य कार्यालयात वार्षिक सर्वसाधारण सभेच्या 7 दिवसांअगोदर पाठवावेत.

सन्माननीय भागधारक बंधू आणि भगिनींनो,

संस्थेच्या 55 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी संचालक मंडळाच्या वतीने व संस्थेचा अध्यक्ष या नात्याने मी आपणा सर्वांचे मनःपूर्वक स्वागत करतो. 31 मार्च 2024 अखेर संपणाऱ्या आर्थिक वर्षाचा अहवाल आपणापुढे सादर करतांना मला अतिशय आनंद होत आहे. दिनांक 31 मार्च 2024 रोजी संपलेल्या सहकार वर्षातील संस्थेचे जमाखर्च, नफातोटा पत्रक, ताळेबंद पत्रक, नफ्याचे समायोजन व सन 2024-2025 चे अंदाज पत्रक आपल्यासमोर मंजुरी करिता सादर करीत आहे.

- **लाभांश :** संस्थेच्या प्रगती मध्ये आपणा सर्वांचेच मोलाचे सहकार्य लाभले आहे, हे मी आपल्या समोर नम्रपणे सांगू इच्छितो. सन 2023-2024 या वर्षाकरिता सभासदांना 11% लाभांश वाटण्यात यावा असा संचालक मंडळाचा निर्णय आपणास सादर करीत आहे.
- **संचालक मंडळाच्या सभा :** सन 2023-2024 या सहकार वर्षात संचालक मंडळाच्या एकूण 12 सभा झाल्यात सभेत सर्व निर्णय एकमताने घेण्यात आलेत.
- **एकूण ठेवी :** संस्थेवर असलेल्या विश्वासार्हतेमुळे सन 2023-24 या आर्थिक वर्षात रु. 7,93,75,736.86 च्या ठेवी प्राप्त केल्याने 31/3/2024 अखेर एकंदर ठेवी रु. 89,94,46,013.29 च्या झाल्या आहेत. सभासदांनी मुदती ठेवी तसेच आवर्त ठेवी आपल्याच संस्थेत ठेवून आकर्षक व्याजदराचा लाभ घ्यावा.
- **एकूण कर्ज :** 31/3/2023 अखेरीस संस्थेची कर्जबाकी रुपये 51,74,87,153.30 होती त्यात सन 2023-24 या वर्षात रूपये 1,98,10,808.55 ची वाढ झाल्याने रुपये 53,72,97,961.85 झाली.
- **गुंतवणूक :** 31/3/2023 रोजी संस्थेची गुंतवणूक रूपये 45,13,99,860.00 इतकी होती ती सन 2023-2024 या आर्थिक वर्षात रूपये 6,23,14,663.00 ने वाढून 31/3/2024 अखेर गुंतवणूक रुपये 51,37,14,523.00 इतकी आहे.
- **खेळते भांडवल :** 31/3/2023 रोजी संस्थेचे भांडवल रूपये 1,09,65,06,809.59 होते त्यात सन 2023-2024 या वर्षात रुपये 8,89,60,122.95 ची वाढ झाल्याने ते रूपये 1,18,54,66,932.54 इतके झाले.
- **शुध्द नफा :** 31/3/2023 अखेरीस संस्थेचा शुध्द नफा रूपये 1,64,24,150.75 इतका होता त्यात सन 2023-2024 या वर्षात रुपये 23,01,130.88 ने वाढ झाल्याने तो रूपये 1,87,25,281.63 इतका झाला.
- **लेखा परीक्षण :** सन 2023-2024 चे वैधानिक लेखा परीक्षण सनदी लेखा परीक्षक मेसर्स कुळकर्णी असोसिएटस्, नागपूर यांचे तर्फे करण्यात आले. त्यात त्यांनी संस्थेच्या प्रगती व एकूण कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करीत संस्थेला सन 2023-2024 या वर्षाकरीता ऑडिट वर्ग 'अ' कायम केला. परीपूर्ण ऑडिट केल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.
- **कर्ज वसुली :** संस्थेला सहकार विभागातर्फे थकीत कर्ज वसुलीची कार्यवाही करण्यासाठी विशेष वसुली अधिकाऱ्यांचे अधिकार प्राप्त असून त्या अंतर्गत थकीत वसुलीची कार्यवाही सुरू आहे. थकीत कर्जदार सभासदांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आपले थकीत कर्ज भरून संस्थेला सहकार्य करावे व पुढील अप्रिय कारवाईची वेळ टाळावी, तसेच सह आवेदक सभासदांनी सुद्धा थकीत कर्जाकरीता पाठपुरावा करून संस्थेला सहकार्य करावे.
- **दैनिक जमा व कर्ज वसुली योजना:** संस्थेत विवेक संचय योजनेअंतर्गत दैनिक जमा व कर्ज वसुली योजना गेल्या 29 वर्षांपासून सुरु असून या योजनेअंतर्गत व्यवसाय वाढीकरता व योजनेचा प्रसार करण्यासाठी संस्थेने 12 प्रतिनिधींचा समावेश केलेला आहे. व्यावसायिकांना दैनिक पैसे जमा करण्याची सोय एजंटमार्फत करून देण्यात आली आहे तसेच व्यवसायाच्या वाढीसाठी या योजनेत आवश्यक कर्ज देऊन त्यांना सहकार्य करण्यात येते. या कर्जाची वसूली एजंट मार्फत दररोज करण्यात येते. तरी सभासदांनी या योजनेचा लाभ घ्यावा.

* **स्वामी विवेकानंद जयंती कार्यक्रम :** दरवर्षी प्रमाणे याही अहवाल वर्षात संस्थेद्वारे स्वामी विवेकानंद जयंती कार्यक्रम मोठया उत्साहाने साजरा करण्यात आला. यानिमित्त सुप्रसिध्द वक्ते व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रातांचे सह संघचालक मा.श्री. श्रीधरजी गाडगे यांना निमंत्रीत करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार व शिक्षक सहकारी बँकेचे अध्यक्ष मा.श्री. अनिलजी सोले उपस्थित होते. मा.श्री. श्रीधरजी गाडगे यांनी आपल्या ओघवत्या वाणीतून स्वामी विवेकानंदाच्या संपूर्ण जीवनचरित्रावर प्रकाश टाकला स्वामी विवेकानंदाचे विचार आजही समस्त भारतवासीयांसाठी प्रेरणादायी असून विवेकानंद सोसायटी सुध्दा याच विचारांवर मार्गक्रमण करीत असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. यावेळी कार्यक्रमास संस्थेचे सभासद, ग्राहक, हितचिंतक व श्रोते मोठया संख्येने उपस्थित होते.

* **महिला दिवस :** दिनांक ८ मार्च २०२४ रोजी संस्थेत जागतिक महिला दिवस साजरा करण्यात आला. संस्था दरवर्षी महिला दिन मोठया उत्साहाने साजरा करते. यावर्षी विविध क्षेत्रातील महिला अधिकारी व कर्मचारीवर्ग या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेच्या महिला अधिकारी व कर्मचारी मिळून आयोजन केले होते.

* **गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार :** संस्थेत दरवर्षी सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात येतो. याही वर्षी विवेकानंद जयंती कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रातांचे सह संघचालक मा.श्री. श्रीधरजी गाडगे, माजी आमदार व शिक्षक सहकारी बँकेचे अध्यक्ष मा.श्री अनिलजी सोले व सहकारी भारती नागपूर महानगराचे अध्यक्ष व साधना सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री घनश्यामजी कुकरेजा यांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांमध्ये कशिश संजय जोगे, शाश्वत मनोज वैद्य, कनक शरद राजोरिया, अथर्व राजेंद्र अंधारे, कु अदिती रूपेश जोजारे, अंश हरीनारायण येवले, पुर्वा शैलेन्द्र रोकडे, कु राजसी अमित दाणी, सफल देवेन्द्र माताघरे, कौस्तुभ भूषण कोलारकर, कु सानीका प्रशांत बांगरे. इयत्ता बारावी - कु सिध्दी अजय जोहरापूरकर, कौशल संजय बुले. पदवी/पदविका/ इतर भरीव कामगिरी - कु गौरी प्रकाश देशकर, रजत राजेश हुमणे, कु श्रावणी सुनील शिर्के, कु श्रीयम प्रदीप व्यास, कु शर्मिष्ठा सतिश नासेरी आणि डॉ श्री राजेश विशोधन मुरकुटे - होमोपॅथी विभूषण सम्मान- २०२३ यांचा समावेश होता. यावेळी कार्यक्रमाला संस्थेचे सभासद, ग्राहक व नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.

* **केंद्रीय संगणकीकरण प्रणाली (कोअर बॅकींग सिस्टीम) :** संस्थेने अहवाल वर्षात सीबीएस प्रणालीवर कामकाज करणे सुरु केले आहे. यात संस्थेच्या हुडकेश्वर व प्रतापनगर शाखा मुख्य कार्यालयाशी जोडण्यात आलेल्या आहे. यामुळे सभासदांना कुठल्याही शाखेतून व्यवहार करणे सोयीचे झाले आहे. सभासदांना उपलब्ध सेवांमध्ये सध्या मोबाईल बँकींग ॲप, क्युआर कोड, करंट अकाउंट ज्यावर संस्था व्याज सुध्दा देते यांचा समावेश आहे. सभासदांनी या सेवेचा लाभ घ्यावा.

* **संस्थेला मान्यवरांच्या भेटी, शुभेच्छा व अभिनंदन :** चालू आर्थिक वर्षात संस्थेला विविध मान्यवरांनी सदिच्छा भेटी दिल्या यामध्ये राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे अखिल भारतीय व्यवस्था प्रमुख मा.श्री. मंगेशजी भेंडे. राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे क्षेत्रीय कार्यवाह मा.श्री. बाळासाहेब चौधरी. सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.श्री. दिनानाथजी ठाकूर. राष्ट्रीय महामंत्री मा.श्री. उदयजी जोशी, राष्ट्रीय संघटन मंत्री मा.श्री. संजयजी पाचपोर. भारतीय रिझर्व बँकेचे संचालक मा.श्री. सतिशजी मराठे. टीजेएसबी बँकेचे अध्यक्ष. मा.श्री. शरदजी गांगल. महाराष्ट्र को.ऑप. बँक फेडरेशनचे संचालक मा.श्री. सत्यनारायणजी लोहिया यांचा समावेश आहे. संस्थेचे सभासद मा श्री नितीनजी गडकरी हे नागपूर लोकसभा मतदार संघातून सलग तिस-यांदा भरघोस मताधिक्याने निवडून आल्याबद्दल व पुन्हा केंद्रिय मंत्री झाल्याबद्दल तसेच निती आयोगाच्या सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल मा श्री नितीनजींचे हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा. भारतीय क्रिकेट संघाने यंदाचा टी-२० विश्वकप जिंकल्याबद्दल कर्णधार रोहीत शर्मा, सर्व संघ सहकारी, संघ व्यवस्थापन आणि सपोर्ट स्टाफ चे हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा. पॅरीस येथे संपन्न झालेल्या ऑलम्पीक स्पर्धेकरिता सर्व विजयी भारतीय खेळाडूंचे अभिनंदन आणि हार्दिक शुभेच्छा.

* **संस्थेचा व्यवसाय :** संस्थेचा व्यवसाय हा दरवर्षी वाढतो आहे. हा व्यवसाय नियोजनबध्दरित्या अधिक वाढला पाहिजे व संस्थेशी शहरांतील गृह उद्योग, लघु उद्योग, दुकानदार व इतर जोडल्या गेले पाहिजे त्याकरिता संस्था मॅसेजेस, मोबाईल ॲप, क्युआर कोड, करंट अकाउंट, बचत खाते, नेट बॅकींग या माध्यमातून मार्केटिंग करित आहे. सभासदांनी देखील सुध्दा आपल्या परिचीत छोट्या व्यावसायिकांना, ओळखीच्या दुकानदारांना संस्थेकडे आकर्षित करावे आणि खाते उघडून वर उल्लेखित सेवा घेण्यास सांगीतले पाहिजे. त्यासाठी आपण मोबाईल क्रमांक ७०२८९०२८१५ यावर संपर्क करु शकता .

* **संस्थेच्या शाखा :** संस्थेच्या मुख्य कार्यालय आणि मुख्य शाखेसह प्रताप नगर व हुडकेश्वर सह एकूण तीन शाखा कार्यरत आहेत. मुख्य कार्यालयासह तिन्ही शाखांना कोअर बँकिंग प्रणालीने जोडण्यात आले आहे. सर्व शाखा उत्तम व्यवसाय करीत आहे. संस्था आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्राहकांना उत्कृष्ठ सेवा प्रदान करीत आहे. यात NEFT, RTGS, DEMAND DRAFT, FUND TRANSFER इत्यादी सुविधा व या सोबत E-nach ची सेवा देखील सुरू केलेली आहे. संस्थेत मिनी एटीएम सेवा सुरू असून कुठल्याही क्रेडिट किंवा डेबीट कार्डचा उपयोग करून ग्राहक संस्थेतून रोख रक्कम काढू शकतात. संस्थेत सुवर्ण खरेदी व तारण कर्ज

योजना सुरू असून कर्जाचा व्याजदर सर्वात कमी १० टक्के ठेवला असून व्याजाची आकारणी रिड्यूसींग पध्दतिने होत आहे. संस्थेत उपलब्ध सर्व कर्ज व ठेव योजनांचा सभासदांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष विवेक जुगादे व उपाध्यक्ष महेश अंधारे यांनी केले.

* **भविष्यातील योजना :** संस्थेच्या हुडकेश्वर येथे स्वमालकीचा भूखंड असून त्यावर संस्थेची भव्य दिव्य अशी सुसज्ज इमारत बांधण्याचा संस्थेचा मानस आहे. त्यासाठी लागणारी आवश्यक परवानगी घेवून व आपल्या सहकार्याने हे करणे शक्य होईल. तसेच संस्थेचे कार्यक्षेत्र सध्या नागपूर जिल्हा पुरते सीमित आहे.हे कार्यक्षेत्र वाढवून विभागीय स्तरावर कार्यक्षेत्र झाले पाहिजे असा संचालक मंडळाचा प्रयत्न आहे.व त्या दृष्टीने संस्थेची वाटचाल सुरु आहे.

* **श्रध्दांजली :** संस्थेचे सभासद सर्वश्री शशांक पतींगे, रामकृष्ण कुळकर्णी, निळकंठ नत्थुजी राउत, सुरेश नारायण लोटे, सुदाम रामाजी नंदनवार, आशुतोष हरकरे, विनय दळवी, विलास तभाने, दत्ता राउत, अनिल लाभे, विवेक प्रजापति, मनोज (राजू) उजवणे, विरेंद्र कोठेकर, संग्राम मंडले, दीपक गहूकर, घनश्याम हजारे आणि श्रीमती वैशाली इटनकर यांचे दुःखद निधन झाले. संस्था या सर्वांना तसेच ज्ञात-अज्ञात मृत सभासदांना आणि नामवंत नागरिक, वक्ते, राजकारणी, समाजसेवक, सिने/ नाट्य कलावंत, खेळाडू, पत्रकार व सैनिक या मध्ये **श्रीमती सीमा रमेश देव-** सुप्रसिध्द मराठी-हिंदी सिने नटी. **श्रीमती ए वलारमथी-** इसरो च्या वरिष्ठ वैज्ञानिक आणि चंद्रयान-३ च्या प्रक्षेपणात महत्वाची भूमिका तसेच या मिशन काऊंटडाउन ची घोषणा करणाऱ्या पहिल्या एपीजे अब्दुल कलाम पुरस्काराच्या मानकरी. **श्री बिशनसिंग बेदी-** भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार व फिरकी गोलंदाज. **श्री अंशुमन गायकवाड,** माजी क्रिकेटपटू आणि विविध खेळाडू घडविणारे कोच. **श्री निळकंठ ज्ञानेश्वर गोरे तथा हभप बाबा महाराज सातारकर-** ज्येष्ठ व सुप्रसिध्द कीर्तनकार. **श्री नईम सैयद तथा ज्युनिअर मेहमूद-** सुप्रसिध्द हिंदी चित्रपट कलावंत, कॉमेडिअन आणि गायक. बाल कलाकारापासून अभिनयाची सुरूवात. **श्री मधुपजी पांडेय -** जी एस कॉमर्स कॉलेज नागपूर चे निवृत्त व्याख्याता, हिंदी भाषे वर प्रभुत्व, प्रसिध्द हास्य कवी, साहित्यिक, व्यंगचित्रकार, कुशल मंचसंचालक आणि खासदार सांस्कृतिक महोत्सवाचे सक्रीय सदस्य, **श्री अमीन सयानी-** रेडिओचा आवाज, रेडिओकिंग, ज्येष्ठ सूत्रसंचालक, उदघोषक आणि विविध भारती तसेच रेडिओ सिलोन वरील बिनाका गीतमाला हा प्रसिध्द कार्यक्रम सादरकर्ते, **श्री मनोहर जोशी-** राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि शिवसेनेचे ज्येष्ठ नेते, **श्री पंकज उदास** पदमश्री पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ गजल गायक, 'चिट्ठी आई है' फेम, **आचार्य श्री विद्यासागरजी महाराज** जैनमुनी आणि तपस्वी, **श्री संजय (भाऊ) काणे-** संपूर्ण जीवन खेळासाठी समर्पित करणारे ज्येष्ठ क्रीडा मार्गदर्शक, ॲथलेटिक्स प्रशिक्षक, नवमहाराष्ट्र क्रीडा मंडळाचे संस्थापक आणि दादोजी कोंडदेव क्रीडा पुरस्काराने सन्मानित, **श्री बळवंतराव ढोबळे-** जनसंघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते, माजी आमदार. **श्री यशवंत पेंढारकर -** विको उद्योग समूहाचे अध्यक्ष आणि सर्वेसर्वा, **श्री अजित दिवाडकर -** ज्येष्ठ रंगकर्मी आणि अजित बेकरी चे सर्वेसर्वा, उद्योजक आणि **श्री प्रभाकर (भैयासाहेब) मुंडले** सुप्रसिध्द उद्योजक व धरण बांधकाम तज्ञ तसेच दि ब्लाईंड रिलीफ संस्था, धरमपेठ शिक्षण संस्था, व्हीसीए आणि बीसीसीए च्या विविध पदांची धुरा वाहिलेले व्यक्तिमत्व. तसेच भारत मातेच्या संरक्षणाकरिता शहीद झालेले भारतीय जवान, या सर्व मान्यवरांना संस्था भावपूर्ण श्रध्दांजलि अर्पित करते. समस्त संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे.

* **आभार प्रदर्शन :** या अहवालाच्या निमित्ताने आपल्याशी संपर्क प्रस्थापित करण्याची संधी मला मिळाली त्याबद्दल आनंद वाटतो. संचालक मंडळाच्या विश्वासाहर्तेमुळे व आपणा सर्वांच्या सहकार्यामुळे संस्थेची प्रगतीच होत आहे. संस्थेचे सर्व ठेवीदार व हितचिंतक तसेच नागपूर नागरीक सहकारी बैंक, कॅनरा बैंक, शिक्षक सहकारी बैंक, ॲक्सिस बैंक, आयसीआयसीआय बँक, पिओसीट सॉफ्टवेअर सोल्युशंस प्रा लि पुणे येथील कर्मचारी वृदांनी या सहकार वर्षात दिलेल्या सहकार्याबद्दल संस्था या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानते. डाकलेखा कार्यालय, डाक व दूरसंचार कार्यालय, न्यू इंग्लिश हायस्कूल, दि विदर्भ प्रीमिअर को-ऑप हाउसिंग सोसायटी, शासकीय तंत्रशिक्षण कार्यालय, पिओसीट सॉफ्टवेअर पुणे येथील कर्मचारीवृंद तसेच विभागीय सहनिबंधक कार्यालय, उपनिबंधक कार्यालय शहर (२), जिल्हा उपनिबंधक कार्यालय येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे. या सर्वांनी संस्थेच्या कामकाजामध्ये सक्रिय सहभाग दिल्यामुळे प्रगतीची वाटचाल करणे सोयीचे झाले. मी अशी अपेक्षा करतो की आपले सहकार्य आम्हाला भविष्यातही असेच मिळत राहील.

विवेक दिनकरराव जुगादे
अध्यक्ष
संचालक मंडळाच्या अनुमतीने

नागपूर
दिनांक : 29/07/2024

जमा खर्च 31 मार्च 2024 अखेर

अ.क्र.	विवरण		जमा
1.	प्रारंभिक शिल्लक		2,06,47,695.20
	अ) हस्तस्थ रोख	1,83,951.00	
	ब)बँक बचत खाते	83,79,339.77	
	क)ओव्हर ड्राफ्ट खाते	1,20,84,404.43	
2.	भाग भांडवल		46,06,300.00
3.	निधी		12,80,791.00
4.	ठेवी		1,16,79,24,205.96
5.	इतर ठेवी		3,24,661.00
6.	देणे व्याज		6,10,81,780.00
7.	गुंतवणूक		16,99,05,693.00
8.	गुंतवणुकीवरील येणे व्याज		3,07,36,614.00
9.	कर्ज		27,19,81,366.30
10.	स्थावर मालमत्ता		46,20,637.20
11.	टी.डी.एस. (बँक)		1,23,35,832.00
12.	वस्तु व सेवा कर		21,34,847.10
13.	कर्मचारी व प्रतिनिधी अग्रीम		6,73,233.00
14.	कर्जावरील व्याज प्राप्त		5,89,85,792.64
15.	गुंतवणुकीवर व्याज प्राप्त		2,03,25,088.46
16.	प्रवेश शुल्क (भाग भांडवल)		11,845.00
17.	भाग अर्ज विक्रीपासून प्राप्त		6,574.00
18.	चेक परत फी		7,74,300.00
19.	सेवा शुल्क (विसंयो)		1,90,519.00
20.	कर्ज वितरण सेवा शुल्क		30,24,438.00
21.	दस्तऐवज शुल्क		5,590.00
22.	निरीक्षण शुल्क		89,200.00
23.	भाग परत फी		1,13,962.00
24.	सेवा शुल्क (पॉलीसी असाईनमेंट)		7,415.00
25.	पास बुक शुल्क		5,624.00
26.	स्क्रॅप विक्रीपासून प्राप्त		444.00
27.	कर्ज अर्ज विक्रीपासून प्राप्त		80,110.00
28.	विसयो कमीशन		17,792.00
29.	नोटीस फी		2,02,600.00
30.	विजीट फी		2,04,450.00
31.	लॉकर भाडे प्राप्त		2,44,934.00
32.	इन्सीडेंटल चार्जेस		22,314.00
33.	सभागृह रखरखाव शुल्क		18,100.00
34.	पीओएस मशीनवर व्याज प्राप्त		2,251.65
35.	खाते देखभाल शुल्क		2,29,723.00
36.	मुदतीपूर्व कर्जखाते बंद शुल्क		3,37,684.00
37.	जुने वाहन विक्री		73,436.00
38.	इतर उत्पन्न		22,875.00

अ.क्र.	विवरण	खर्च
1.	भाग भांडवल	23,36,000.00
2.	निधी	33,71,197.02
3.	ठेवी	1,08,85,48,469.10
4.	इतर ठेवी	3,49,935.50
5.	देणे व्याज	7,59,92,775.00
6.	इतर देयता व तरतूद	10,73,072.39
7.	गुंतवणूक	23,22,20,356.00
8.	गुंतवणुकीवरील येणे व्याज	2,34,56,694.46
9.	कर्ज	29,17,92,174.85
10.	स्थावर मालमत्ता	55,22,585.20
11	टी.डी.एस. (बँक)	1,15,44,295.00
12.	वस्तु व सेवा कर	15,19,751.06
13.	कर्मचारी व प्रतिनिधी अग्रीम	6,63,613.00
14	ठेवीवर व्याज दिले	4,22,05,023.00
15.	कर्मचारी वेतन	73,20,384.00
16.	कर्जावर सुट	3,06,739.44
17.	सॉफ्टवेअर एएमसी	1,92,000.00
18.	कोर्ट खर्च	92,152.00
19.	छपाई व लेखन सामुग्री	1,42,896.00
20.	वाहन खर्च	2,55,269.00
21	जाहिरात खर्च	3,58,120.00
22.	दुरध्वनी व इंटरनेट खर्च	1,19,345.88
23	सभा खर्च	1,07,692.00
24.	टपाल खर्च	45,088.00
25.	कार्यालयीन खर्च	16,89,753.00
26.	टॅक्स ऑडीट फी	30,000.00
27.	लेखा परिक्षण खर्च	6,50,000.00
28.	आमसभा खर्च	7,71,623.00
29.	बँक चार्जेस व कमीशन	61,678.80
30.	युपीएस बॅटरी देखभाल खर्च	56,000.00
31.	व्यवसाय कर	1,00,000.00
32.	अंतर्गत लेखा परिक्षण	1,20,000.00
33.	विद्युत देयक व खर्च	5,63,251.00
34.	पाण्याचे देयक	2,604.00
35.	सेमीनार व प्रशिक्षण शुल्क	60,750.00
36.	वर्तमानपत्र व मासिक	3,125.00
37.	संगणक रखरखाव खर्च	24,596.00
38.	देणगी	68,028.00
39.	विमा खर्च	1,50,435.00
40.	विवेक संचय योजना कमीशन	11,98,905.00
41.	वस्तु व सेवा कर	4,11,947.00
42.	सरकारी कर व देणे	2,05,119.00

जमा खर्च 31 मार्च 2024 अखेर

अ.क्र.	विवरण	जमा
39.	कमीशन प्राप्त	11,972.00
	एकूण	1,83,32,62,689.51

अ.क्र.	विवरण		खर्च
43.	वैद्यकीय विमा संस्था		49,307.00
44.	समारंभ व कार्यक्रम खर्च		1,98,952.00
45.	बोनस		9,84,946.00
46.	उदवाहन देखभाल खर्च		22,881.00
47.	निवडणुक खर्च		100.00
48.	अभिकर्ता वाहन भत्ता		6,68,245.00
49.	शाखा भाडे (हुडकेश्वर)		2,98,191.00
50.	इमारत व फर्निचर देखभाल		43,022.00
51.	कर्मचारी भविष्य निर्वाहन निधी संस्था		8,47,236.00
52.	इएसआयसी संस्था		1,38,432.00
53.	तरतूद		2,00,000.00
54.	दूरुस्ती व सेवा शुल्क		17,064.00
55.	अंतिम शिल्लक		3,40,90,870.81
	अ)हस्तस्थ रोख	6,39,612.00	
	ब)बँक बचत खाते	3,08,22,687.15	
	क)ओव्हर ड्राफ्ट खाते	26,28,571.66	
	एकूण		1,83,32,62,689.51

नफा-तोटा पत्रक 31 मार्च 2024 अखेर

2022-2023	व्यय	2023-2024
5,96,60,587.00	1. ठेवीवर व्याज दिले	4,22,05,023.00
66,184.54	2. बँक चार्जेस व कमिशन	61,678.80
62,05,143.00	3. कर्मचारी वेतन व इंसेटिव्ह	83,05,330.00
88,466.00	4. दूरध्वनी व इंटरनेट खर्च	1,19,345.88
86,152.00	5. छपाई व लेखन सामग्री	1,42,896.00
29,62,746.00	6. संपत्तीवरील घसारा	30,02,852.00
9,08,734.15	7. विवेक संचय योजना कमिशन	11,98,905.00
71,400.00	8. जाहिरात खर्च	3,58,120.00
1,21,100.00	9. देणगी	68,028.00
12,14,109.00	10. कार्यालयीन खर्च	16,89,753.00
55,502.00	11. सभा खर्च	1,07,692.00
5,06,510.00	12. विद्युत देयक व खर्च	5,63,251.00
53,939.00	13. संगणक रखरखाव खर्च	24,596.00
1,18,139.00	14. विमा	1,50,435.00
1,33,297.00	15. पी.पी. एफ. (संस्था)	
5,58,000.00	16. लेखा परीक्षण खर्च	6,50,000.00
46,015.00	17. वैद्यकीय विमा (संस्था)	49,307.00
0.00	18. ए.एम.सी. सॉफ्टवेअर	1,92,000.00
86,783.00	19. कोर्ट खर्च	92,152.00
70,860.00	20. सरकारी कर व देणी	2,05,119.00
22,881.00	21. उदवाहन देखभाल खर्च	22,881.00
2,47,148.00	22. वाहन खर्च	2,55,269.00
1,788.00	23. पाण्याचे देयक	2,604.00
25,00,000.00	24. अनुत्पादक कर्जाची तरतूद	25,00,000.00
2,00,000.00	25. स्टॅन्डर्ड असेट प्रोव्हिजन	2,00,000.00
1,76,646.00	26. समारंभ व कार्यक्रम खर्च	1,98,952.00
53,763.00	27. निवडणुक खर्च	100.00
30,000.00	28. टॅक्स ऑडीट फी	30,000.00
4,17,571.00	29. इमारत व फर्निचर देखभाल	43,022.00
15,355.00	30. दुरुस्ती व सेवा शुल्क	17,064.00
1,05,852.00	31. ई.एस.आय.सी. संस्था	1,38,432.00
2,60,940.00	32. शाखा किराया हुडकेश्वर	2,98,191.00
5,49,104.85	33. अभिकर्ता वाहन भत्ता	6,68,245.00
2,000.00	34. वर्तमान पत्रे व मासिक	3,125.00
1,32,585.00	35. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (संस्था)	8,47,236.00
4,43,111.00	36. वार्षिक सर्वसाधारण सभा	7,71,623.00
1,10,000.00	37. अंतर्गत लेखा परीक्षण शुल्क	1,20,000.00
3,19,408.81	38. कर्जावर सूट	3,06,739.44
-----	39. सेमिनार व प्रशिक्षण शुल्क	60,750.00
-----	40. व्यवसाय शुल्क	1,00,000.00
23,645.00	41. टपाल	45,088.00
-----	42. युपीएस बॅटरी देखभाल खर्च	56,000.00
-----	43. वस्तु व सेवा कर	4,11,947.00
1,64,24,150.75	**शुद्ध नफा**	**1,87,25,281.63**
9,50,49,616.10	एकूण	**8,50,09,033.75**

2022-2023	आय	2023-2024
5,91,68,866.61	1. कर्जावरील व्याज प्राप्त	5,89,85,792.64
3,09,55,669.40	2. गुंतवणुक व बँक खात्यावरील व्याज प्राप्त	2,03,25,088.46
28,12,981.00	3. कर्ज वितरण सेवा शुल्क	30,24,438.00
64,700.00	4. कर्ज अर्जाची विक्री	80,110.00
7,62,794.00	5. चेक परत फी	7,74,300.00
572.00	6. इतर किरकोळ प्राप्त	------
73,800.00	7. नोटीस फी	2,02,600.00
18,116.00	8. कमीशन (वि.सं.यो.)	17,792.00
14,600.00	9. दस्ताऐवज शुल्क	5,590.00
11,600.00	10. सभागृह रखरखाव शुल्क	18,100.00
1,03,350.00	11. निरीक्षण शुल्क	89,200.00
3,21,738.00	12. लॉकर शुल्क प्राप्त	2,44,934.00
5,849.00	13. पासबुक शुल्क	5,624.00
2,519.09	14. पी.ओ.एस.मशिनवर व्याज प्राप्त	2,251.65
52,950.00	15. स्क्रॅप विक्रीपासून प्राप्त	444.00
1,83,141.00	16. सेवा शुल्क (वि.सं.यो.)	1,90,519.00
6,358.00	17. सेवा शुल्क (पॉलीसी असाईनमेंट)	7,415.00
68,280.00	18. भाग परत फी	1,13,962.00
22,651.00	19. इंन्सीडिन्टल चार्जेस	22,314.00
10,047.00	20. इतर कमीशन प्राप्त	11,972.00
58,500.00	21. विजीट फी	2,04,450.00
7,980.00	22. भाग अर्जाची विक्री	6,574.00
2,28,238.00	23. खाते देखभाल शुल्क	2,29,723.00
94,316.00	24. कर्ज फोरक्लोजर चार्जेस	3,37,684.00
00.00	25. प्रवेश फी	11,845.00
----	26. जुने वाहन विक्री	73,436.00
----	27. इतर	22,875.00
9,50,49,616.10	एकूण	**8,50,09,033.75**

श्री विवेक जुगादे
अध्यक्ष

श्री महेश अंधारे
उपाध्यक्ष

आनंद श्रीराम गोंधळेकर
मुख्य कार्यकारी अधिकारी

ताळेबंद पत्रक 31 मार्च 2024 रोजीचे

2022-2023	देयता		2023-2024
4,00,00,000.00	क) अधिकृत भाग भांडवल		4,00,00,000.00
2,72,29,915.00	ख) भाग भांडवल		2,95,00,215.00
8,60,62,378.68	**ग) राखीव व इतर निधी :**		9,73,28,010.34
2,95,33,294.72	1. राखीव निधी	3,38,71,559.40	
3,07,33,223.00	2. इमारत निधी	3,27,92,333.00	
8,32,436.00	3. साधारण निधी	8,32,436.00	
10,88,269.00	4. धर्मदाय निधी	15,88,269.00	
4,00,000.00	5. लाभांश समीकरण निधी	4,00,000.00	
33,76,477.00	6. गुंतवणूक अस्थिरता निधी	45,26,477.00	
3,44,000.00	7. कल्याण निधी	3,44,000.00	
12,57,277.00	8. कर्मचारी कल्याण निधी	12,52,277.00	
25,35,000.00	9. संगणकीकरण निधी	30,35,000.00	
1,05,000.00	10. आकस्मिक खर्च निधी	1,05,000.00	
38,20,794.00	11. सुवर्ण महोत्सव निधी	38,20,794.00	
13,25,378.00	12. कर्मचारी सेवा निवृत्ती लाभ निधी	18,05,040.00	
82,58,398.96	13. बुडित कर्ज निधी	1,02,01,993.94	
2,50,000.00	14. सहकार प्रशिक्षण निधी	3,50,000.00	
22,02,831.00	15. स्टँडर्ड ॲसेट प्रोव्हीजन	24,02,831.00	
82,00,70,276.43	**घ) ठेवी :**		89,94,46,013.29
71,80,50,105.00	1. मुदत ठेवी	79,97,79,129.00	
1,87,15,388.00	2. आवर्त ठेवी	2,02,63,998.00	
6,36,68,451.76	3. बचत ठेवी	5,64,84,516.02	
35,60,145.67	4. सुरक्षित ठेवी	30,95,567.67	
1,60,76,186.00	5. विवेक संचय योजना	1,91,77,411.00	
-------	6. करंट खाते	6,45,391.60	
3,75,00,000.00	च) अनुत्पादक कर्जाची तरतूद		4,00,00,000.00
35,68,667.91	छ) देयता व तरतुदी		50,15,346.00
11,06,882.00	ज) लाभांश		16,77,294.00
7,71,75,560.00	झ) देणे व्याज		6,22,64,565.00
2,70,67,841.49	फ) अनुत्पादक जिंदगीवर येणे व्याज		3,06,05,855.34
1,83,588.30	त) इतर ठेवी		1,58,313.80
1,11,771.06	ठ) वस्तु व सेवा कर		7,26,867.10
1,64,29,928.72	र) **नफा :**		1,87,44,452.67
5,777.97	मागील वर्षीचा संचित नफा	19,171.04	
1,64,24,150.75	(+) चालू वर्षात नफा	1,87,25,281.63	
00.00	(-) समायोजन	00.00	
1,09,65,06,809.59	एकूण		**1,18,54,66,932.54**

श्री विवेक जुगादे
अध्यक्ष

श्री महेश अंधारे
उपाध्यक्ष

आनंद श्रीराम गोंधळेकर
मुख्य कार्यकारी अधिकारी

ताळेबंद पत्रक 31 मार्च 2024 रोजीचे

2022-2023	संपती		2023-2024
2,06,47,695.20	अ) रोख व बँकेतील शिल्लक :		3,40,90,870.81
1,83,951.00	1. हस्तस्थ रोख	6,39,612.00	
83,79,339.77	2. बँक	3,08,25,487.15	
1,20,84,404.43	3. ओव्हरड्राफ्ट खाते बाकी	26,28,571.66	
3,54,03,222.40	ब) गुंतवणुकीवर येणे व्याज		2,81,23,302.86
45,13,99,860.00	क) गुंतवणुक व मुदत ठेवी :		51,37,14,523.00
98,32,428.00	1. नागपुर नागरिक सहकारी बँक लि.	4,05,55,306.00	
7,00,000.00	2. नागपुर नागरिक सहकारी बँक (आरडी)	8,00,000.00	
3,12,43,409.00	3. यवतमाळ अर्बन को ऑप. बँक लि.	--------	
4,00,21,824.00	4. तिरुपती अर्बन को-ऑप. बँक लि	1,65,19,521.00	
----	5. डोंबीवली नागरिक सहकारी बँक लि	1,00,00,000.00	
4,40,00,000.00	6. यस बँक	4,40,00,000.00	
4,18,42,121.00	7. सारस्वत को-ऑप बँक लि.	5,23,90,712.00	
1,74,94,533.00	8. गांधीबाग सहकारी बँक लि.	1,14,94,533.00	
7,75,04,271.00	9. राजकोट नागरी सह बँक लि.	7,75,04,271.00	
5,00,000.00	10. रवि कमर्शियल बँक लि.	--------	
1,65,16,706.00	11. कासमॉस को ऑप बँक लि.	3,35,56,922.00	
2,00,00,000.00	12. आयसीआयसीआय बँक लि.	4,15,00,000.00	
31,30,679.00	13. शिक्षक सहकारी बँक लि.	36,55,442.00	
2,22,10,020.00	14. ठाणे जनता सहकारी बँक लि.	2,02,00,000.00	
3,07,96,869.00	15. वर्धमान को-ऑप बँक लि.	1,56,05,816.00	
21,00,000.00	16. कॅनरा बँक आरडी खाते, हुडकेश्वर	24,00,000.00	
3,10,00,000.00	17. इंडसइंड बँक	3,10,00,000.00	
3,25,00,000.00	18. एसवीसी बँक लि.	4,25,00,000.00	
3,00,00,000.00	19. कॅनरा बँक	3,00,00,000.00	
------	20. ए.यु.स्मॉल फायनांस लि.	2,00,00,000.00	
-------	21. एच.डी.एफ.सी. बँक लि.	2,00,00,000.00	
7,000	22. इतर ठेवी	32,000.00	
51,74,87,153.30	ड) कर्ज बाकी		53,72,97,961.85
47,02.694.00	इ) **संपत्ती 1:-**		39,11,157.00
1,39,736.00	1. विज अनामत ठेव	1,39,736.00	
7,650.00	2. दूरध्वनी अनामत ठेव	7,650.00	
10,000.00	3. पाणी अनामत ठेव	10,000.00	
42,49,144.00	4. टीडीएस (बँक)	34,57,607.00	
2,40,731.00	5. गुंतवणूक टीडीएस कपात	2,40,731.00	
55,433.00	6. टीडीएस	55,433.00	
3,76,04,563.20	ई) **संपत्ती 2 : -**		**3,55,98,240.20**
1,50,58,408.00	1. भूमी	1,50,61,408.00	
1,24,25,769.00	2. इमारत	17,33,888.00	
53,304.00	3. संगणक	1,31,777.00	
35,58,508.00	4. फर्निचर	33,75,199.00	
2,273.00	5. इन्व्हर्टर	1,932.00	
26,564.00	6. मारुती ओमनी	----	
2,21,496.00	7. मारुती इको	1,88,272.00	
37,772.00	8. नोट काउंटिंग मशीन	32,106.00	
2,31,218.00	9. युपीएस व बॅटरी	1,96,535.00	
12,69,922.00	10. विद्युत उपकरणे	10,79,434.00	
32,630.00	11. वॉटर प्युरिफायर	27,735.00	
35,351.00	12. दूरचित्रवाणी संच	30,048.00	
54,086.20	13. सीसीटीव्ही कॅमेरा	1,47,810.20	
16,46,793,00	14. एअर कँडिशन	14,07,636,00	
9,28,490.00	15. सोलर पॅनल्स	7,89,216.00	
----	16. प्रताप नगर प्रॉपर्टी	97,06,371.00	
12,276.00	17. मोबाईल फोन हँडसेट	31,264.00	
19,959.00	18. इपीबीएएक्स मशीन	16,965.00	
34,084.00	19. व्हायरस मशीन	28,971.00	
6,30,546.00	20. रूग्णवाहिका	5,35,964.00	
7,900.00	21. एलपीजी कनेक्शन	7,900.00	
87,849.00	22. एटीएम पीओएस मशीन	22,849.00	
12,29,365.00	23. महेंद्र बोलेरो	10,44,960.00	
1,86,838.00	फ) कर्मचारी व अभिकर्ता अग्रिम		1,77,218.00
2,70,67,841.49	त) अनुत्पादक जिंदगी वर येणे व्याज		3,06,05,855.34
10,084.00	थ) इतर देणी व तरतुदी		45,526.48
6,03,358.00	द) संगणक प्रणाली खरेदी		5,08,777.00
17,500.00	ड) प्रताप नगर शाखा सुरक्षा निधी		17,500.00
50,000.00	ढ) हुडकेश्वर शाखा सुरक्षा निधी		50,000.00
5,000.00	ट) नियोजित फेडरेशन शेअर्स		5,000.00
------	ठ) वस्तु सेवा कर		------
13,21,000.00	ध) आयकर येणे		13,21,000.00
1,09,65,06,809.59	एकूण		**1,18,54,66,932.54**

नफा-तोटा समायोजन (सन 2023-2024)

अ.क्र.	विवरण	राशी
1	राखीव निधी	46,81,320.00
2.	लाभांश तरतूद - 11%	30,71,392.00
3.	इमारत निधी	26,00,000.00
4.	गुंतवणूक अस्थिरता निधी	20,00,000.00
5.	कर्मचारी सेवा निवृत्ती निधी	10,00,000.00
6.	मानधन	3,00,000.00
7.	सहकार प्रशिक्षण निधी	80,000.00
8.	संगणकीकरण निधी	5,00,000.00
9.	धर्मदाय निधी	5,00,000.00
10.	बुडित कर्ज निधी	40,00,000.00
	शिल्लक नफा	11,740.67
	एकूण	**1,87,44,452.67**

अ.क्र.	विवरण		राशी
1.	**नफा :**		**1,87,44,452.67**
	मागील वर्षीचा	19,171.04	
	चालू वर्षीचा	1,87,25,281.63	
	एकूण		**1,87,44,452.67**

अंदाज पत्रक (सन 2024-2025)

अ.क्र.	विवरण	राशी
1.	ठेवीवर व्याज	6,40,00,000.00
2.	व्यवस्थापन खर्च	90,00,000.00
3.	कार्यालयीन व इतर खर्च	1,25,00,000.00
4.	घसारा खर्च	30,00,000.00
5.	नफा	1,95,00,000.00
	एकूण	10,80,00,000.00

अ.क्र.	विवरण	राशी
1.	कर्जावरील व्याज	6,50,00,000.00
2.	गुंतवणूक व्याज	3,50,00,000.00
4.	इतर उत्पन्न	80,00,000.00
	एकूण	10,80,00,000.00

श्री विवेक जुगादे
अध्यक्ष

श्री महेश अंधारे
उपाध्यक्ष

आनंद श्रीराम गोंधळेकर
मुख्य कार्यकारी अधिकारी

A.S. KULKARNI & ASSOCIATES
Chartered Accountants

HEAD OFFICE
Plot No. 11, Vidya Vihar Colony, Pratap Nagar,
Nagpur-440 022, Maharashtra,
Ph. No.: 0712-2246252, 2222651,
E-mail: ask_arti@rediffmail.co
BRANCHES: PUNE, THANE, MUMBAI, BENGALURU

लेखा परीक्षकाचा अहवाल

महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा कलम 81 आणि महाराष्ट्र सहकारी संस्थाचा नियम 69 (3) आणि (4) अन्वये द्यावयाचा

1. आम्ही विवेकानंद नागरी सहकारी प्रत्यय संस्था मर्यादित, चिटणीस पार्क समोर, रुईकर रोड, महाल, नागपूर-400032. रजि. नं. एन.जी.पी./बी.एन. के/162/1969 या संस्थेचा सोबत जोडलेला 31 मार्च 2024 या दिनांकाचा ताळेबंद व सन 2023-2024 या सहकारी वर्षाचे नफातोटा पत्रक तपासले आहे. ह्या आर्थिक पत्रकांची संपूर्ण जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाची आहे. आमची जबाबदारी त्या आर्थिक पत्रकावर आमच्या लेखापरीक्षणाचे आधारे आमचे मत प्रकट करणे एवढेच आहे.
2. आमचे अंकेक्षण हे भारतामध्ये प्रचलीत असलेल्या अंकेक्षण मानक अनुसार केले आहे. त्या अंकेक्षण मानकानुसार अंकेक्षण करताना अंकेक्षकाने योजनाबध्दतेने अंकेक्षण करून आर्थिक पत्रकांमध्ये गंभीर दोष व चुका नाहीत याबद्दल आवश्यक विश्वासार्हता संपादीत करणे आवश्यक आहे. अंकेक्षणामध्ये, आर्थिक पत्रकामध्ये दिलेली माहीती ही योग्यरित्या दर्शविली आहे. याची नमुना पद्धतीने पडताळणी करण्यात येते व संबंधीत रकमेचे पुरावे पडताळण्यात येतात. अंकेक्षणामध्ये लेखांकन मानक व प्रमुख अंदाज यांचे सर्वेक्षण करण्यात येते व त्याची आर्थिक पत्रकात दिलेल्या माहितीशी सुसंबध्दता तपासण्यात येते.
3. वरील नमुद केलेल्या अनु.क्र. 1 व 2 आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व आमचा लेखापरिक्षण अहवाल व त्यातील परिशिष्ट 'अ' 'ब' व 'क' यास अधिन राहून, आम्ही सादर करतो की :-
   1. ताळेबंद व नफातोटा पत्रक हे नियम 62 (1) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियम 1961 प्रमाणे तयार करण्यात आले आहे.
   2. आम्ही आमच्या माहीती प्रमाणे, व समजुती प्रमाणे लेखा परीक्षणासाठी आवश्यक असणारी सर्व माहीती व सर्व स्पष्टीकरण संस्थेकडून प्राप्त करून घेतली आहे.
   3. संस्थेच्या पुस्तकांच्या लेखापरीक्षणानंतर, आमच्या मतानुसार महाराष्ट्र संस्था अधिनियम 1960, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 व संस्थेचे पोटनियम या अन्यये आवश्यक असलेली हिशोबाची योग्य ती पुस्तके संस्थेकडून ठेवण्यात आली आहेत.
   4. लेखापरीक्षण केलेले ताळेबंद व नफातोटा पत्रक संस्थेनी ठेवलेली पुस्तके यांचेशी जुळते.
   5. आमच्या मते, अहवालात नमुद केलेले ताळेबंद व नफातोटा पत्रक सोबत जोडलेल्या परिशिष्ट **'अ' 'ब'** व **'क'** मधील त्रुटी वगळता द इन्स्टीट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटस ऑफ इंडिया यांनी जाहीर केलेल्या अकाउंटीग स्टॅण्डर्ड्स अन्वये आहेत.
   6. आमच्या अंकेक्षणानुसार
      1. अहवालात नमूद केलेले त्रुटी वगळता संस्थेचे सर्व व्यवहार हे कायद्यातील तरतुद आणि नियम, उपनियम व संस्थेच्या उपविधी व तरतूदीशी सहमत आहे.
      2. संस्थेने खात्यात नमूद करावयाच्या सर्व रकमांच्या नोंदी घेतल्या आहेत.
      3. संस्थेच्या खर्च किंवा वसूलपात्र रकमा या मध्ये कुठलेही गंभीर किंवा आक्षेपार्ह व्यवहार आढळले नाही.
      4. अनुत्पादक जिंदगी खाती वगळता संस्थेची रोख अथवा संपत्ती बुडीत अथवा संशयीत नाही.
   7. आमच्या मते व आमच्या माहितीनुसार व आम्हाला मिळालेल्या माहिती व खुलाशाचे आधारे संस्थेचे हिशोब, अधिनियमानुसार आवश्यक अशी सर्व माहीती देतात व त्यातुन खालील बाबतीत वास्तवीक व खरे चित्र दिसुन येते.
      1. ताळेबंदाच्या बाबतीत 31 मार्च 2024 या तारखेपर्यंत संस्थेच्या कारभाराची स्थिती.
      2. नफातोटा पत्रकाच्या बाबतीत दिनांक 31 मार्च 2024 रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षातील नफ्याबाबत. सन 2023-2024 या सहकारी वर्षासाठी संस्थेस लेखा परीक्षण वर्ग **'अ'** देण्यात आला आहे.

मे ए. एस. कुलकर्णी ॲन्ड असोसिएट्स
सनदी लेखापाल
FRN No. 120262W

A.S. Kulkarni & Associates Chartered Accountants FRN 120262W Nagpur

सीए. देवेन्द्र इंदुरकर
MRN: 126458
भागीदार

दिनांक : 19.07.2024
स्थान : नागपूर

UDIN: 24126458BKEDVX6744

शाखानिहाय अधिकारी, कर्मचारी व दैनिक अभिकर्ते यांची नांवे व पदनाम

मुख्य कार्यालय व मुख्य शाखा महाल

अ.क्र.	नाव	पदनाम
1.	श्री. आनंद गोंधळेकर	मुख्य कार्यकारी अधिकारी
2.	श्री. आशुतोष देव	व्यवस्थापक
3.	श्री. शशांक पांडे	सहव्यवस्थापक
4.	श्री. संदीप किर्तने	सहा. व्यवस्थापक (वसुली)
5.	सौ. मीनल दंदे	अधिकारी
6.	श्री. आनंद भदे	वरिष्ठ लिपिक
7	श्री. ब्रजेश जोशी	वरिष्ठ लिपिक
8.	सौ. आरती घाटे	अधिकारी
9.	कु. मृणाल पाठक	वरिष्ठ लिपिक
10.	सौ. सारिका ठाकरे	वरिष्ठ लिपिक
11.	श्री. अनंता मांगे	अधिकारी
12.	श्री. आदित्य जोशी	लिपीक
13.	श्री. सतिश धापोडकर	लिपीक
14.	सौ. प्राप्ती हांडे	लिपीक
15.	सौ. नेहा पायाळ	लिपीक
16.	श्री. नचिकेत टांकसाळे	लिपीक
17.	श्री. योगेश पराते	लिपीक
18.	सौ. मनिषा गोसावी	लिपीक
19.	श्री. अमित गुलगुलवार	लिपीक
20.	श्री. ज्ञानेश्वर ढोक	वाहन चालक
21.	श्री. गजेन्द्र पौनिकर	शिपाई
22.	श्री. राजेन्द्र शिर्के	वाहन चालक
23.	श्री. वृषभ राणे	शिपाई
24.	सौ माधुरी लांडे	शिपाई

शाखा : प्रतापनगर

1.	सौ. शुभांगी चोबितकर	शाखा व्यवस्थापक
2.	श्री. चंदन डोंगरवार	अधिकारी
3.	सौ. टिना टेकाडे	अधिकारी
4.	श्री. राकेश वाटकर	लिपिक
5.	श्री. प्रफुल्ल राजवैद्य	शिपाई

शाखा : हुडकेश्वर

1.	सौ. विद्या पराडकर	शाखा व्यवस्थापक
2.	श्री. राहुल पाचपोर	अधिकारी
3.	श्री. विलास खापेकर	लिपिक
4.	कु. सानिका जोशी	लिपिक
5.	श्री. चेतन सातर्पैसे	शिपाई

दैनिक अभिकर्ते मुख्य शाखा, महाल

अ.क्र.	नाव
1.	श्री. राम इंदुरकर
2.	श्री. गोविंदा ठवरे
3.	श्री. कुलदीप धनाडै
4.	श्री. प्रशांत उंबरकर
5.	श्री. विनय नागपुरकर
6	श्री. प्रसन्न ठाणेकर
7.	श्री. संदीप अलोणी
8.	सौ. मंजुषा बिलसे

दैनिक अभिकर्ते हुडकेश्वर

अ.क्र.	नाव
1.	श्री प्रशांत नारायणराव सराफ

दैनिक अभिकर्ते प्रतापनगर

अ.क्र.	नाव
1.	श्री. विजय भागवतकर
2.	श्री. पिराजी दुलांगे
3.	श्री. विजय भोयर

ग्राहक सेवा क्रमांक

कर्ज विभाग
8956073676

लेखा विभाग
9175217758

वसुली विभाग
7028901975

मार्केटिंग व ग्राहक सेवा विभाग
7028901915

मार्केटिंग व ग्राहक सेवा विभाग
7028901915

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय व्यवस्था प्रमुख मा. श्री. मंगेशजी भेंडे यांचा सत्कार करतांना संस्थेचे अध्यक्ष, संस्थेचे उपाध्यक्ष व संचालकगण

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम क्षेत्राचे क्षेत्रीय कार्यवाह मा. श्री. बाळासाहेब चौधरी यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करतांना संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालकगण

संस्थेच्या वतीने आयोजित विवेकानंद जयंती कार्यक्रमात संस्थेच्या सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करतांना माजी आमदार मा. श्री. गिरीशजी व्यास, विदर्भ प्रांत सहसंघचालक मा. श्री. श्रीधरजी गाडगे व साधना सहकारी बँकेचे अध्यक्ष मा. श्री. घनश्यामजी कुकरेजा

भारतीय रिझर्व बँकेचे संचालक मा. श्री. सतीशजी मराठे यांचा सत्कार करतांना संस्थेचे अध्यक्ष श्री. विवेक जुगादे व संचालकगण

देशातील अग्रगण्य टीजेएसबी बँकेचे अध्यक्ष मा. श्री. शरदजी गांगल तसेच महाराष्ट्र को-ऑप. बँक फेडरेशनचे संचालक मा. श्री. सत्यनारायणजी लोहीया यांनी संस्थेला सदिच्छा भेट दिली असता संस्थेतर्फे त्यांचा सत्कार करतांना संस्थेचे अध्यक्ष श्री. विवेक जुगादे व उपाध्यक्ष श्री. महेश अंधारे

संस्थेचे सभासद व नागपुरातील सुप्रसिद्ध होमीयोपॅथ डॉ. मा. श्री. राजेशजी मुरकुटे यांना राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात त्यांचा सत्कार करतांना माजी आमदार मा. श्री. गिरीशजी व्यास, विदर्भ प्रांत सहसंघचालक मा. श्री. श्रीधरजी गाडगे व साधना सहकारी बँकेचे अध्यक्ष मा. श्री. घनश्यामजी कुकरेजा

दर महिन्यात ठराविक रक्कम भरा व लखपती व्हा...

रक्कम	कालावधी	देय रक्कम
8100	12	100886
3900	24	101055
2500	36	100856
1800	48	101550
1400	60	102830

दि. 18.4.2024 पासून मुदत ठेवींचे आकर्षक व भरघोस व्याजदर

मुदत ठेव व मासीक मुदत ठेव

ठेवीचा कालावधी	व्याज दर
1 महिन्यांकरिता	4.00 %
3 महिन्यांकरिता	4.50 %
6 महिन्यांकरिता	5.50 %
12 महिन्यांकरिता	7.00 %
18 महिन्यांकरिता	7.25 %
24 महिन्यांकरिता	7.50 %
36 महिन्यांकरिता	8.00 %

ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि विधवांकरिता 0.5% जास्त व्याजदर

आवर्त ठेव 1 वर्ष ते 3 वर्ष	7.00 %
बचत ठेव	4.00 %

विवेक संचय योजना (दैनिक बचत ठेव)

संस्थेची वैशिष्ट्ये

- दरवर्षी ऑडीट वर्ग 'अ' मिळणारी एकमेव संस्था.
- झालेल्या व्यवहाराची 'एसएमएस' ने त्वरित माहिती.
- बँकिंग संबंधित सर्व आधुनिक सुविधा देणारी एकमेव संस्था.
- संपूर्ण संगणकीकृत.
- तत्पर सेवा
- सुसज्ज वातानुकुलीत संस्था.
- विविध कर्ज योजनांतर्गत त्वरीत कर्ज उपलब्ध.
- ठेवींवर आकर्षक व्याजदर.

5 वां वार्षिक अहवाल २०२३-२०२४

विवेकानंद सोसायटीची लक्षणीय कामगिरी

Deposit
90 Crore

Loan
54 Crore

Total Business
144 Crore

Working Capital
118 Crore

Investment
51 Crore

Share Capital
3 Crore

Profit
2 Crore+

आम्ही घेतली उत्तुंग झेप

संस्थेच्या सेवा-सुविधा

- NEFT•RTGS DD
- CORE BANKING
- LOCKERS
- Swapping Machine
- MOBILE BANKING
- QR CODE

चालू खाते

आता मिळवा
CURRENT ACCOUNT
वर 3% व्याज दर

महाल मुख्य शाखा

361, चिटणीस पार्क समोर,
रुईकर रोड, महाल, नागपूर-440032.
0712-2957477 09175217758.
e-mail : vivsocmahalbr@gmail.com

प्रतापनगर शाखा

361, ब्लॉक नं. 3,4,5,6, SE RLY, EMP STF
सोसायटी कॉम्प्लेक्स, नक्षत्र सेलिब्रेशन जवळ,
प्रतापनगर, नागपूर-440026.
0712-2955526 07028901974.
vivekanandsocpnagar@gmail.com

हुडकेश्वर शाखा

प्लॉट नं. 2, स्वस्तिक संकुल, ॲक्सिस बँक बाजूला,
हुडकेश्वर रोड, नागपूर-440024
0712-2751888 09975711966
vivekanandsochkr@gmail.com

Ideaz Creative 9881971528